


दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA




vadalvartanews@gmail.com

●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● गुरुवार २१ मार्च २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २१८ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# बीड लोकसभेच्या निवडणुकीला आगळा-वेगळा रंग येणार

## बजरंग सोनवणे यांचा राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षात हजारो कार्यकर्त्यासह जाहिर प्रवेश...



**बजरंग सोनवणे यांच्या तर २२ मार्चला ज्योतीताई मेटे यांच्या होऊ घातलेल्या पक्षप्रवेशाने बीड जिल्हयातील राष्ट्रवादी कॉंग्रेस शरचंद्र पवार पक्षाची ताकद जरी वाढली असली तरी लोकसभेचे टिकीट नेमके कोणाला जाते याकडे सर्व बीड जिल्ह्यातील नागरीकांचे लक्ष लागले आहे.**

माझ्या मागची असणारी कार्यकर्त्यांची ताकद कापत चालली होती त्यामुळे माझे कार्यकर्ते जिवंत रहाण्यासाठी मी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला आहे.
**बजरंग सोनवणे**
**चेअरमन येडेश्वरी साखर कारखाना**



**वादळवार्ता/पुणे**
लोकसभेच्या १७ व्या सार्वत्रिक निवडणुकीचे बिगुल वाजले, आदर्श आचारसंहिता लागु झाली याच धरतीवर बीड लोकसभेसाठी भाजपा सह इतर मित्र पक्षाकडून उमेदवार म्हणून माजी ग्रामविकास मंत्री पंकजाताई मुंडे यांची उमेदवारी जाहिर करण्यात आली तर महाविकास आघाडीच्या वतीने आद्यापर्यंत उमेदवारी जाहिर केलेली नाही. मात्र याच धरतीवर राजकारण तथा समाजकारणामध्ये चांगला दबदबा असणारे तथा येडेश्वरी साखर कारखान्याचे चेअरमन शेतकरीपुत्र बजरंग सोनवणे यांनी आज पुणे येथील असणाऱ्या राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्यालया मध्ये पक्ष प्रमुख शरदचंद्र पवार, जयंतराव पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये हाजोरो कार्यकर्त्यासह पक्ष प्रवेश केला आहे. आजच्याच दिवशी शिसंग्रामच्या ज्योतीताई मेटे यांचा सुद्धा पक्षप्रवेश होता परंतू त्यांनी आज प्रवेश न करता २२ मार्च रोजी प्रवेश करणार असल्याचे समजते आहे.

## लोकसभा निवडणूक

### अकोल्यात कॉंग्रेसचा उमेदवार? प्रकाश आंबेडकर आघाडीत राहणार की नाही?!;



कॉंग्रेसच्या केंद्रीय निवडणूक समितीची आज दिल्लीत महत्त्वाची बैठक पार पडली आहे. या बैठकीत कॉंग्रेस महाराष्ट्रात 18 जागांवर निवडणूक लढवणार असल्याचा निर्णय घेण्यात आला. या बैठकीला महाराष्ट्रातील कॉंग्रेसचे नेते उपस्थित होते. यामध्ये महाराष्ट्र कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात, कॉंग्रेस आमदार सतेज पाटील यांचा समावेश होता. या बैठकीत महाराष्ट्रातील कॉंग्रेस उमेदवारांची नावे निश्चित करण्यात आली. या उमेदवारांची यादी 'टीव्ही 9 मराठी'च्या हाती लागली आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, कॉंग्रेसने अकोल्याच्या जागेसाठी उमेदवाराचं नाव निश्चित केलं

### कराळे मास्तर लोकसभा निवडणुकीसाठी इच्छुक



वऱ्हाडी भाषेतून शिक्षणाचे धडे देणारे कराळे मास्तर लोकसभा निवडणुकीसाठी इच्छुक आहेत. वर्ध्यातून लढण्यासाठी कराळेंनी, शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून तिकीट मिळवण्यासाठी प्रयत्न सुरु केले आहेत. पुण्यात कराळेंनी पवारांची भेटही घेतली आहे. आपल्या गावयान स्ट्राईनं विद्यार्थ्यांना शिक्षणाचे धडे देणारे कराळे मास्तर आणि फेमस् यू ट्युबर थेट लोकसभेच्या रिंगणात उतरण्याची शक्यता आहे.

### उमेदवारी अर्ज भरण्यापूर्वी किती भरावे लागते डिपॉझिट?




निवडणुकीचे बिगुल अखेर वाजले. अनेक इच्छूक उमेदवारांनी पक्षांभोवती गराडा घालण्यास सुरुवात केली आहे. कुणाची युती झाली आहे तर कुणाची आघाडी. प्रतिस्पर्धी उमेदवाराला पराभूत करण्यासाठी जो तो आपापल्या परीने तयारी करत आहेत. मात्र, निवडणुकीत सामान्य व्यक्ती उमेदवार म्हणून उभा राहू शकतो का? उमेदवार अर्जासाठी अनामत रक्कम किती असते? उमेदवार अर्ज दाखल करण्यासाठी काय प्रक्रिया असते असे प्रश्न मनात येतात. तर, होय! अगदी सामान्य व्यक्तीही उमेदवार म्हणून अर्ज दाखल करू शकतो. लोकप्रतिनिधी कायद्यानुसार निवडणुकीत उमेदवारी करू इच्छिणाऱ्या व्यक्तीला 25 हजार रुपये अनामत रक्कम भरावी लागते. तसेच उमेदवारांसाठी खर्चाची मर्यादा तब्बल 95 लाख रुपये ठेवण्यात आली आहे.

## सोनाजी बाबा सौंदर्य यांना वंचित कडुन अभिवादन

**वादळवार्ता/नवगण राजुरी**
**वादळवार्ता/बीड** वंचित बहुजन आघाडीचे मराठवाड्याचे नेते चोखाजी नाना सौंदर्य यांचे वडील कट्टर आंबेडकरी विचारांचे निष्ठावंत असलेले सोनाजी बाबा सौंदर्य यांच्या जलदान विधीच्या कार्यक्रमाला वंचित बहुजन आघाडी ,भारतीय बौद्ध महासभा, तसेच आप्तेष्ट नातेवाईक व गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थित असलेले वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा अध्यक्ष अशोक हिंगे पाटील यांनी वंचित बहुजन आघाडीच्या वतिने सोनाजी बाबा यांना श्रद्धांजली वाहुन त्यांच्या कार्यावर प्रकाश टाकला यावेळी जालना व बीड जिल्ह्यातील असंख्य वंचित बहुजन आघाडीचे, भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.यात बबन वडमारे, बालाजी जगतकर, ज्ञानेश्वर कवठेकर, अजय सरवदे,जालना जिल्हा कार्याध्यक्ष परमेश्वर खरात, रामचंद्र पानवाले,सुदाम मस्के, हेमंत पाडेवार, भास्कर साळवे, अंकुश लांडगे, देविदास कोळे, हनुमंत मोरे, शिवाजी डोळस, बाळू वागळे, बाबासाहेब शिंदे, पिराजी गायकवाड, बाळू वाघमारे, बाबासाहेब दाभाडे, राहुल नाटकर, डॉ भदर्गे आदींसह तालुक्यातील असंख्य समाज बांधव उपस्थित होते.



## बाल विवाह प्रतिबंध उपक्रमात उत्कृष्ट कार्य ;जरंडी ग्रामपंचायतला पुरस्कार

**वादळवार्ता/सोयगाव**
महिला व बाल विकास विभागाच्या बाल विवाह प्रतिबंध उपक्रमात जरंडी ग्रामसंसद कार्यालयाने महिलांची ग्रामसभा घेऊन या उपक्रमात उत्कृष्ट कार्य केल्या बद्दल ग्रामविकास अधिकारी सुनील मंगरुळे व सरपंचा स्वातीताई पाटील यांना उत्कृष्ट पुरस्कार जाहीर झाला जरंडी गावात शासनाच्या बाल विवाह प्रतिबंध उपक्रम राबवून बाल विवाह होऊ दिले नाही त्यामुळे महिला व बालविकास विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी सुवर्णा जाधव व जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी डॉ विकास मीना यांनी जरंडी ग्रामपंचायतीला उत्कृष्ट पुरस्कार जाहीर केला आहे त्या पुरस्काराचे प्रमाण पत्र जिल्हा परिषदेच्या वतीने पाठविण्यात आले आहे. अशी माहिती ग्रामविकास अधिकारी सुनील मंगरुळे यांनी दिली



## काळ्या काचा असणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई

**दैनिक वादळ वार्ता बीड/परवेज पटेल**
बीड काळ्या काचा असणाऱ्या चार चाकी वाहनांवर दंडात्मक कारवाई करा असे आदेश जिल्हाधिकारी दीपा मुधोळ- मुंडे यांनी पारित केल्याने एआरटीओ कडून कारवाई सुरू करण्यात आली असून आतापर्यंत ४५ वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. आदर्श आचारसंहिता लागू असेपर्यंत ही कारवाई मोहीम सुरूच राहणार आहे. लोकसभा निवडणूक काळात काळ्या काचा असणाऱ्या वाहनातून दारू, हत्यारे,पैसे याची वाहतूक कोणी करू नये याकरिता जिल्हा प्रशासनाकडून सतर्कतेने कारवाई केली जात आहे. पहिल्याच दिवशी काळ्या फिल्म लावलेल्या ४५ वाहनांच्या फिल्म काढून दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. या मोहिमेत बीड उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांच्या पथकातील मोटार वाहन निरीक्षक पथकातील मोटार वाहन निरीक्षक पंकज यादव, सचिन जमखंडीकर, सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक योगेश रबडे, पूजा खडकीकर,पवन गायके, श्रीराम क्षीरसागर, प्रदीप बिराजदार, शशिकांत जाधव, महेश भोसले अशा आठ अधिकाऱ्यांचा समावेश होता. या पथकाने जालना रोडवरील बीड बायपास रस्त्यावर महालक्ष्मी चौकात काल मंगळवार दिनांक १९ मार्च रोजी सकाळ व संध्याकाळ दोन-दोन तास वाहनांची तपासणी करून चार तासात ४५ वाहनांवर दंडात्मक कारवाई केली. यामुळे जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानंतर आरटीओ यंत्रणा सतर्क झाल्याचे पाहायला मिळाले. ही यंत्रणा निवडणूक पूर्ण होईपर्यंत दररोज वाहनांची तपासणी करणार आहे.



# वीज कंपनीतील भरती प्रक्रिया थांबवून कंत्राटी कामगारांना न्याय देणार- आभा शुक्ला अपर मुख्य सचिव ( ऊर्जा )

**दैनिक वादळ वार्ता**
**उरण/विठ्ठल ममताबादे**
राज्याच्या अपर मुख्य सचिव ( ऊर्जा ) श्रीमती आभा शुक्ला यांनी वीज कंत्राटी कामगारांच्या शिष्ट मंडळा सोबत मंगळवार दि.१९ मार्च २०२४ रोजी त्यांच्या दालनात मीटिंग घेतली . राज्यातील महावितरण महापारेषण आणि महानिर्मिती कंपनीतील कंत्राटी कामगारांनी ५ मार्च ते नऊ मार्च बेमुदत काम बंद आंदोलन केले होते या पार्श्वभूमीवर ही बैठक घेण्यात आली या बैठकीमध्ये अनेक निर्णय घेण्यात आले. १) हरियाणा राज्यातील कंत्राटदारमुक्त रोजगार करिता ऊपकंपनी बाबतीत अभ्यास करून लवकरच निर्णय घेतला जाईल. २ ) भरती प्रकीया मध्ये कंत्राटी कामगारांना वयाची सवलत व २५ मार्क देण्यात येतील या करिता भरती प्रकीया थांबविण्यात येईल व फॉर्म भरण्यास मुदत वाढ देण्यात येईल.३ ) ८ वी पास आय टी आय व १० वी पास आय टी आय च्या कामगारांना भरती प्रकीया मध्ये समाविष्ट करण्यात येईल. ४ ) कामगारांची सेवा जेष्ठता यादी तयार करून या नुसार सर्व्हीस बेनिफिट देण्यात येईल. ५ ) वयाच्या ६० व्या वर्षी पर्यंत शाश्वत रोजगार करिता आवश्यक त्या तरतूदी कल्याणकारी योजना राबविण्यात येईल. ६) कामगारांना ऐस्क्रो बँक खात्याद्वारे थेट खात्यात वेतन दिले जाईल.७ ) कामगारांना मेडिक्लेम व अपघाती मृत्यू योजना नुसार लाभ देण्यात येईल. ८ ) आंदोलना नंतर ज्या कामगारांना कामावर रुजू करून घेतले नाही त्या कामगारांना कामावर रुजू करून घेतले जाईल या मीटिंग मध्ये समितीचे राज्य संघटक सचिन मेंगाळे, उमेश आनेराव नचिकेत मोरे, कमलेश राणे, राजन भानुशाली,कृष्णा भोयर उपस्थित होते. तिन्ही वीज कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालकां सोबत पुन्हा एक बैठक घेण्यात येईल त्या वेळी पगार वाढ व अन्य महत्वपूर्ण मुद्यांवर चर्चा करण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले.



## संपादकीय

# डाळिंब खाण्याचे फायदे मोठे, पण अशा लोकांनी करु नये सेवन

पल्या आरोग्यासाठी फळे ही महत्त्वाची मानली जातात. जी लोकं फळे खातात ती लवकर आजारी पडत नाहीत. अनेक फळांमध्ये महत्त्वाचे गुणधर्म असतात. असेच एक फळ म्हणजे डाळिंब. हे फळ खूरच चविष्ट आणि गोड आहे. जे अनेक आजारांवरही फायदेशीर आहे. अशक्तपणा दूर करण्यासाठी डॉक्टर डाळिंब खाण्याचा सल्ला देतात.



डाळिंब या फळात व्हिटॅमिन सी आणि बी असते. यामध्ये मॅग्नेशियम, पोटॅशियम, फॉस्फरस, सेलेनियम आणि झिंक मुबलक प्रमाणात असते. डाळिंब खाण्याचे जसे फायदे आहेत तसे काही तोटे देखील आहेत. जाणून घेऊया डाळिंबचे फायदे आणि तोटे.

डाळिंबमध्ये अँटिऑक्सिडंट गुणधर्म असतात. डाळिंबाच्या रसामध्ये इतर फळांच्या रसापेक्षा जास्त अँटिऑक्सिडंट असतात. यामुळे पेशींचे नुकसान होण्यापासून संरक्षण होते.

कॅन्सरपासून बचाव करायचा असेल तर तुम्ही डाळिंब खालले पाहिजे. कॅन्सरने त्रस्त लोकांसाठी डाळिंबाचा रस फायदेशीर ठरतो. प्रोस्टेट कर्करोगाच्या पेशी टाळण्यासाठी डाळिंबाच्या रसाचे सेवन केले पाहिजे. त्यामुळे कर्करोगाचा धोकाही कमी होऊ शकतो.

अल्झायमरपासून बचाव करायचा असेल तरी डाळिंब खाल्ले पाहिजे. याच्या बिया अल्झायमर रोगाचा विकास रोखतात आणि व्यक्तीची स्मरणशक्ती मजबूत करतात.

पचनासाठी डाळिंबाचा रस आतड्यांतील जळजळ कमी करून पचन सुधारते. पण जर डायरियाचा त्रास असेल तर त्यांनी डाळिंबाचा रस न खाण्याचा सल्ला दिला जातो.

सांधेदुखी, वेदना आणि इतर प्रकारच्या संधिवातवर डाळिंबाचा रस फायदेशीर आहे. डाळिंबाचा रस हृदयविकारावर देखील फायदेशीर आहे.

रक्तदाबाच्या रुग्णांसाठी देखील डाळिंबाचा रस फायदेशीर मानला जातो. धुमेहाच्या उपचारात डाळिंबाचा रस प्यावा. डाळिंब इंसुलिन आणि रक्तातील साखर कमी करण्यास मदत करते.

डाळिंब खाण्याचे तोटे

कमी रक्तदाब असलेल्या रुग्णांनी डाळिंबाच्या रसाचे सेवन कमी प्रमाणात करावे. डायरियाच्या वेळी देखील डाळिंबाचा रस पिऊ नये. जर तुम्ही तुमच्या त्वचेवर डाळिंबाचा रस लावलात तर अनेकांना खाज सुटणे, सूज येणे किंवा श्वास घेण्यास त्रास होऊ शकतो.

# वनांची क्रूर कत्तल: निसर्गाचा ढासळे समतोल!

[आंतरराष्ट्रीय वन दिवस सप्ताह विशेष.] आपल्या दृष्टीआड असलेल्या सृष्टीचे महत्त्व मानवाला न समजण्याचे हे अगदी स्पष्ट उदाहरण म्हणता येईल. शुध्द हवा, पिण्याचे पाणी आणि इतरही अनेक बाबी आपल्याला मिळतात, ते या वनांमुळेच! मात्र चंगळवादी जीवनशैलीसाठी केल्या जाणाऱ्या बेसुमार जंगल तोडीमुळे निसर्गाचा समतोल ढासळत चालला आहे, हे सन १९७०च्या दशकापासूनच जाणवू लागले. त्यातून जंगले वाचवण्याची संकल्पना पुढे आली. संयुक्त संघाच्या अन्न व शेती संघटनेच्या सदस्य देशांनी हा वर्ल्ड फॉरेस्ट डे- आंतरराष्ट्रीय वन दिन दि.२१ मार्च २०१२पासून साजरा करण्यास सुरुवात केली. श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी यांच्या लेखणीतून वनमहात्म्य विशद... संपादक.

आपण "दृष्टीआड सृष्टी!" असे नेहमीच ऐकत असतो. पण या सृष्टीच्या आड असे काय आहे? जे आपल्याला दृश्य नाही, दिसत नाही. अशा कितीतरी गोष्टी या सृष्टीची चक्रे फिरवत असतात. यामध्ये दगड, माती, हवा, पाणी असे निर्जीव घटक आहेत. त्याचप्रमाणे झाडे-किडे, माणूस-प्राणी, साप-मासे असे विविध सजीवही आहेत. या सर्वांच्या अनुकूल-प्रतिकूल ससंबंधाने शतकानुशतके पृथ्वीचा इतिहास लिहीला जात आहे. या सर्व सजीव-निर्जीव गोष्टींचा प्रभाव एकमेकांवर पडत असतो. त्याचप्रमाणे यांच्या पूरक वापराने एकूणच जीवसृष्टीचे संवर्धनही होत असते. माणूस हा निसर्गाचा वैरी नसून त्याच्याच मदतीने निसर्गाचे जतन व संवर्धन होऊ शकते. जंगलांतून मिळणाऱ्या संसाधनांचा मनुष्याच्या उपजीविकेशी थेट संबंध आहे. इ.स.२००२ साली जंगल संवर्धनासाठी जैवविविधता कायदा मंजूर झाला. सामुहिक वनहक्क कायदा आला. कारण शासनच मोठाली झाडे तोडून उत्पन्न लाभ घेत असे आणि शेतकरी व सामान्य जनतेला वेठीस धरत असे, अटकाव करत असे. म्हणून शेतकरी व आदिवासी बांधवांनी याविरुद्ध दंड थोपटून आवाज उठविला. आदिवासी बांधवांनी तर "नावा नाटे; मावा राज!" म्हणत संघर्ष केला. त्यामुळेच त्यांचे व इतर परंपरेने राहणाऱ्या आणि जंगलांचे संवर्धन करणाऱ्या वननिवासी यांच्या जंगलावरील हक्कांना मंजूरी देण्यात आली. याच कायद्यांचा व इतर शासकीय योजनांचा आधार घेत गावांमध्ये बदल घडू लागले आहेत. याची काही उदाहरणे-

आदिवासी भागात सामुहिक वनहक्क मिळालेला गडचिरोली जिल्हा म्हणून नाव ऐकले असालच. येथील एकूण १०२५ गावांनी जैवविविधता समित्या स्थापन केल्या. त्यात मोठ्या प्रमाणात जंगल संवर्धनाला सुरूवात केली आहे. यातूनच लोकांच्या उपजीविकेचा प्रश्नही सुटत आहे. सन २००५ला आलेल्या या कायद्यानुसार जंगलांतील बांबू, तेंदूपत्ता या सर्वांचे मालकी हक्क ग्रामसभेला मिळाले. बांबूसारख्या वनोपजाची व्यवस्था लोकांनीच केली. यातून बांबूकटाई साठीची मजुरी आधीपेक्षा तिप्पट प्रमाणात लोकांना मिळू लागली, शिवाय या बांबूविक्रीतून गावासाठी आवश्यक विकासकामांस लोकांना पैसे मिळाले. कोरची तालुक्यात सालेम, झेंडेपार, अरवीटोला, अंधेरी, टेंभली, काळेगाव तर धानोरा तालुक्यातील लेखा- मेंढा या गावातील लोकांनी सात एकरात नवीन बांबूची लागवड केली आहे. जे जंगल त्यांना जगवते, त्या जंगलाला ते जगवत आहेत, वाढवत आहेत.

धुळे जिल्ह्यातील बारीपाडा या गावात काही वर्षांपूर्वी वनव्यवस्थापन समिती स्थापन झाली. उजाडलेल्या जंगलाचे संवर्धन झाले. त्यांत चराईबंदी, कुऱ्हाडबंदी वगैरे करण्याचे लोकांनीच ठरविले. वनांतील सर्व झाडांची मोजणी झाली. मोह या उत्पन्न मिळवून देणाऱ्या झाडांचा लिलाव होऊ लागला, ते उत्पन्न गावातील लोकच घेऊ लागले. त्यातून गावात विकासकामे झाली. जंगल वाढीसह भूगर्भातील पाण्याची पातळीही वाढली. उत्तम शेती होऊ लागली; गाव समृद्ध बनत गेले. आणखी उदाहरण धुळे जिल्ह्यातीलच लामकानी गावाचे आहे. शहरात राहणाऱ्या डॉक्टर धनंजय नेवाडकर यांना झालेल्या अपघातामुळे ते काही महिने सक्तीची विश्रांती घेण्यासाठी गावी आले. त्यावेळी लोकांपुढे गुरांचा चारा दुर्मिळ आणि विहिरीचे पाणी आटण्याची मोठी समस्या आहे, असे त्यांच्या लक्षात आले. गावाच्या बाजूलाच सातपुड्याची पर्वतरांग आहे. साधारण एक हजार एकरांचा हा डोंगर सुजलाम-सुफलाम करण्याचे त्यांनी ठरविले. त्यासाठी रोजगार हमी योजनेचा आधार घेतला. पाणी अडवा; पाणी जिरवा, ही कामे तेथे सुरु केली. गावातील लोकांना रोजगार हमी योजनेचा फायदा व रोजगार मिळाला. त्यातून गावातील गुरांच्या चाऱ्याची व पाण्याची समस्या मिटली, का? तर डोंगर पुन्हा समृद्ध बनला आहे.

कोरोना काळातील मागील तीन वर्षांपासून वन्यपशुंचा मानवी वस्त्यांवर हल्ला होत आहे. जनतेचा नाहक बळी जाऊन त्यांची शिकार ठरत आहे, मात्र वन प्रशासन अजूनही कुंभकर्णी झोपेत आहे. वेळीच बंदोबस्त झाला नसल्याने जनता वन प्रशासनास सहकार्य न करण्याच्या पावित्र्यात उभी ठाकली आहे. त्यामुळे शासनाला जबर नुकसानीचा फटका बसू शकतो. म्हणून सकारात्मक पाऊल उचलण्यासाठी व जंगलाचे महत्त्व सर्वांना पटावे म्हणून शासन आणि विविध संस्था यांनी तत्सम नानाविध कार्यक्रम राबवावेत- अनावश्यक जंगलतोड टाळणे, अधिक झाडे लावणे, मनुष्य वस्त्यातील वन्यपशुंच्या हल्ल्यात जीवितहानी होऊ नये, यासाठी प्रशासनाने दक्ष राहणे, जंगलांपासून मिळणारी उत्पादने आणि होणारे फायदे जाणणे इत्यादी जंगलांना सतत भेट देवून माहिती मिळविणे, आदींचा समावेश असतो. जंगलांबाबत आस्था आणि जंगलतोडीमुळे होणाऱ्या हवामानातील बदलांबद्दल काहींना चिंता वाटते. अशा सर्वांना जागतिक पातळीवर व्यासपीठ मिळावे, हा देखील वनदिन साजरा करण्यामागचा उद्देश आहे. बदलत्या हवामानावर भविष्यात उपाययोजना करताना आणि धोरण आखताना जंगलांबाबत योग्य विचार होत असल्याची खात्री या मंचावरून एकत्रितपणे करता येईल. जसे वनांवरील हक्क लोकांना मिळत आहे, तसेच जंगल संवर्धन आणि जतन करण्याची जबाबदारीही लोकांकडे आहे. ज्या भागांत वनव्यवस्थापन समिती नाही किंवा नुसतीच कागदोपत्री आहे, अशा काही गावांतून लोकांना पर्यटनाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होत आहे, मात्र बेजबाबदारपणामुळे त्यावर नियंत्रण नाही. यातून जंगलांचा विनाशच जास्त होत आहे व नको त्या वाईट प्रवृत्ती बोकाळत आहेत. यासाठी संतुलित, शाश्वत, जबाबदार लोकसहभागातून होणाऱ्या वन व्यवस्थापनातूनच शाश्वत उपजीविका निर्माण होईल. सोबतच सर्वांनाच शुद्ध हवा आणि शुद्ध आरोग्य अनुभवता येईल, यात यत्किंचितही शंका नाही!!! आंतरराष्ट्रीय वनदिन सप्ताहाच्या समस्त मानवमात्रांस हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

**श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी.**
**मु. पो. ता. जि. गडचिरोली**
**फक्त व्हॉ. नं. ९४२३७१४८८३.**

# अंडरवर्ल्डचे कर्दनकाळ, ३५ वर्षांची सर्व्हीस, ११३ एन्काऊंटर:सुपरकॉप प्रदीप शर्मा यांना अखेर एन्काऊंटरच भोवले

एकेकाळचे अंडरवर्ल्डचे कर्दनकाळ असलेले एन्काऊंटर स्पेशालिस्ट प्रदीप शर्मा यांची कारकीर्द झळाळणारी होती. त्यांनी अनेक गुंडांचे नामोनिशान मिठविले याबद्दल त्यांना सरकारकडून वेळोवेळी शाबासकी मिळाली. त्यांच्या कारकीर्दीच्या उतारातील मुंबईतील लखन भैय्या एन्काऊंटर त्यांच्या सर्व मेहनतीवर पाणी फेरणारे निघाले. त्यांना या केसमध्ये सत्र न्यायालयाने ज्या मुद्द्यांआधारे निर्दोष सोडले होते. त्याच मद्द्यांवरून मुंबई हायकोर्टाने त्यांना जन्मठेप सुनावली आहे. कधीकाळी एन्काऊंटर स्पेशालीस्ट म्हणून मुंबई पोलिस दलाच्या गळ्यातील ताईत असलेले प्रदीप शर्मा यांना अलिकडे अनेक प्रकरणांनी वादग्रस्त ठरले. त्यांनी आपल्या कारकीर्दीत 113 एन्काऊंटर केली. पोलिसांची नोकरी सोडून राजकारणात पडले. अयशस्वी ठरले. नंतर एंटीलिया केसमध्ये एनआयएने अटक केली, त्यातून जामीन मिळाला तर आता पुन्हा तुरुंगात जाण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे. मुंबई उच्च न्यायालयाने प्रदीप शर्मा यांना साल 2006 च्या रामनारायण गुप्ता उर्फ लखन भैय्या यांच्या खोट्या चकमक प्रकरणात दोषी ठरवित जन्मठेप सुनावली आहे. लखन कथितरित्या गँगस्टर छोटा राजन याचा साथीदार



होता. लखन भैय्या याचा भावाने आपल्या लखन भैय्याला दिवसाढवळ्या साध्या वर्दीतील पोलिसांनी उचलून नेल्याची तक्रार केली होती. लखनचा भाऊ वकील राम प्रसाद गुप्ता यांनी ही केस लढवित प्रदीप शर्मा यांना अडचणीत आणले आहे.एक तार आणि फॅक्स बनला पुरावावकील रामप्रसाद गुप्ता यांनी त्याचा भाऊ लखन भैय्या याच्या अपहरणाची बातमी मुंबई पोलिसांना तार करुन तसेच फॅक्स पाठवून दिली. त्यांना लखन भैय्या याचा एन्काऊंटर होण्याची कुणकुण लागली होती. मुंबई पोलिसांना त्यांनी पोस्टातून पाठविलेला टेलिग्राम ( तार ) आणि फॅक्स मोठा पुरावा बनला. लखन भैय्या याचे अंधेरी पश्चिमेकडील नाना नानी पार्कजवळ एन्काऊंटर झाले. आपला भाऊ लखन याला प्रदीप शर्मा यांनी त्यांच्या केबिनमध्ये लायसन्सी पिस्तुलाद्वारे प्रदीप शर्मा यांनी गोळ्या घातल्या असा आरोप वकील राम प्रसाद गुप्ता यांनी केला होता. परंतू सेशन कोर्टाने शर्मा यांच्या पिस्तुलाच्या बुलेटचा बॅलिस्टीक रिपोर्ट फेटाळला होता. परंतू हाच रिपोर्ट हायकोर्टाने आधारभूत मानला आणि शिक्षा सुनावली.

# मतदान कार्ड आधार सोबत लिंक करा निवडणूक आयोगाचे मतदारांना आवाहन

**दैनिक वादळवार्ता/परवेज पटेल**

बीड लोकसभा निवडणुकीचे पडघम वाजायला सुरुवात झाली आहे. देशभरातील १०२ मतदारसंघांमध्ये आजपासून अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. विविध पक्षांच्या उमेदवारांची घोषणा होत आहे. उमेदवार प्रचार करू लागले आहेत. अशावेळी निवडणूक आयोगही सज्ज झाला आहे. आता मतदारांनाही सज्ज व्हायची वेळ आली आहे. यासाठी निवडणूक आयोगाने मतदानापूर्वी एक महत्वाचे काम करण्यास सांगितले आहे. मतदारांनी त्यांचे मतदान ओळखपत्र आधार कार्डसोबत लिंक करण्यास सांगितले आहे. हे सक्तीचे नसले तरी निवडणुकीत




घोळ होऊ नये असे जर तुम्हाला वाटत असेल तर तुम्ही हे करणे गरजेचे आहे. यामुळे फेक मतदान, एकाच व्यक्तीचे अनेक मतदारसंघांत मतदान आदी गोष्टी टाळता येणार आहेत. यासाठी तुम्हाला एनव्हीएसपीच्या अधिकृत वेबसाईटवर जावे लागणार आहे किंवा व्होटर सर्व्हिस पोर्टलवर जावे लागणार आहे. जर रजिस्टर केलेले नसेल तर करावे लागणार आहे. जर केले असेल तर मोबाईल नंबर, पासवर्ड आणि कॅप्चा कोड टाकून लॉगिन करावे लागणार आहे. रजिस्टर नसाल तर साईन अप करावे लागणार आहे. मोबाईल, कॅप्चा कोड ओटीपी टाकून तुम्हाला रजिस्टर करता येणार आहे. यानंतर मतदार ओळखपत्रावरील नंबर टाकून तुम्ही व्हेरिफाय आणि फिल फॉर्मवर क्लिक करावे. यानंतर भाषा निवडून तुम्ही अर्ज भरू शकता. नेक्स्ट ऑप्शन क्लिक केल्यावर गरजेची माहिती भरावी लागणार आहे

## संस्कृती विद्यालय येथे संविधान कार्यशाळा संपन्न...



वादळवार्ता/बीड

शिक्षणाचे तीर्थक्षेत्र संस्कृती विद्यालय व विवेकवर्धिनी गुरुकुल म्हसोबा फाटा बीड येथे आज पुकार संस्था संविधान फेलोच्या माध्यमाने संविधान कार्यशाळा संपन्न झाली . गेल्या वर्षभर पुकार संस्थेच्या संविधान फेलो कामिनी पवार दर शनिवारी येऊन मुलांना संविधानाबद्दल जनजागृती व माहिती देण्याचे काम करत आहेत. आज पुकार संस्थेच्या संविधान फेलोंच्या या कार्यशाळेसाठी अजीम प्रेमजी फाउंडेशन बेंगलुरुचे हर्ष गुप्ता, सामाजिक कार्यकर्त्या मनीषाताई तोकले, बालकल्याण समिती अध्यक्ष अशोक तांगडे , बालविकास सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ .दत्ता नलावडे, सामाजिक कार्यकर्ते तत्त्वशील कांबळे ,सामाजिक कार्यकर्ते मिथुन जोगदंड, पुकारच्या संविधान फेलो कामिनी पवार उपस्थित होते . दैनंदिन जीवनामध्ये संविधान मुल्ये कशी रुजवावी व त्याचा वापर आपल्या जीवनात कसा करावा याबद्दल उपस्थित मान्यवरांनी मुलांना मार्गदर्शन केले .

अजिम प्रेमजी फौंडेशन चे हर्ष गुप्ता यांनी संविधानाचे महत्त्व सांगितले व तसेच मुलांनी संविधाना संबंधी विचारलेल्या विविध प्रश्नांची समर्पक व समाधान कारक उत्तरे दिली .

सामाजिक कार्यकर्त्या मनिषाताई तोकले यांनी आपल्या संविधानाने सर्व नागरिकांना समान अधिकार दिलेले आहेत आणि या देशात राहणारा प्रत्येक नागरिक तो कोणत्याही जाती धर्माचा असो तो संविधानाच्या समोर समान आहे. जात, धर्म, लिंग, वंश या वरुन कुणाशीही भेदभाव करता येणार नाही. असे सांगितले .

सामाजिक कार्यकर्ते तत्वशिल कांबळे यांनी सध्याच्या परिस्थितीत संविधान हा आपला राष्ट्रीय ग्रंथ समजून घेवून, त्यात दिलेल्या कर्तव्य आणि हक्क याचे पालन सर्वांनी करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केले . वर्ग दहावीतील विद्यार्थी निखिल नलावडे याने संविधान आपल्याला कोणकोणते अधिकार देतं आणि आपण त्याचा कसा वापर करायला पाहिजे याच्याबद्दल आपले मनोगत व्यक्त केले . बाल कल्याण समितीचे अध्यक्ष अशोक तांगडे यांनी या संविधान कार्यशाळेचा आढावा घेवून. आपल्या रोजच्या जीवनात संविधानाच्या मुल्यांची रूजवणूक करुन आपले जिवन सुंदर, समृध्द व सकारात्मक बनवण्याचे आवाहन केले . पुकार संस्थेच्या संविधान फेलो कामिनी पवार यांनी वर्षभर घेतलेल्या प्रशिक्षणाचा आढावा घेतला.

बालविकास सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉक्टर दत्ता नलावडे यांनी उपस्थितांचे स्वागत केले आणि कार्यक्रमाचा समारोप करतांना भारताचे संविधान आपला राष्ट्रीय ग्रंथ आहे त्यामुळे आपल्याला जगण्याचे सर्व अधिकार मिळाले त्या अधिकारासोबतच आपण आपल्या राष्ट्रीय कर्तव्याचे पण पालन करायला हवे असे सांगितले .एकूणच या संविधान कार्यशाळेमुळे मुलांना संविधानाबद्दल सखोल माहिती झाली .

# खडी क्रेशरचा वीज पुरवठा खंडित करण्याचा जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश

## अजूनही काही खडी क्रेशर चालू-अँड. अजित देशमुख

**वादळवार्ता/बीड**

जिल्ह्यात साठ खडी क्रेशर आणि अनेक खदानी विनापरवाना चालू होत्या. यावर जन आंदोलनाने आवाज उठल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांना तात्काळ कारवाई करण्याचे आदेश दिले होते. यानंतर जन आंदोलनाने नारजी व्यक्त केल्यानंतर पुन्हा अधीक्षक अभियंता, महावितरण यांना जिल्हाधिकाऱ्यांनी पत्र दिले असून सर्व बेकायदेशीर खडी क्रशर आणि खदानधारकांचे वीज कनेक्शन कट करण्याचे आदेश दिले असल्याची माहिती जन आंदोलनाचे विश्वस्त अँड. अजित एम. देशमुख यांनी दिली आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या या आदेशानंतर आणि खडी क्रशर सील करण्याचे आदेशानंतर देखील काही खडी क्रेशर चालू असल्याचे निदर्शनास येत असल्याची जनतेचे म्हणणे आहे. त्यामुळे त्या त्या भागातील सहाय्यक अभियंता यांनी वीज चोरीचे गुन्हे दाखल करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे तलाठी, मंडळ अधिकारी आणि तहसीलदार यांनी देखील बेकायदेशीर कामाबाबत संबंधितावर गुन्हे दाखल करणे आवश्यक आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाला न जुमानणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना जिल्हाधिकाऱ्यांनी बडगा दाखवणे आवश्यक आहे. जर कोणी आदेश पादळीत तुडवत असेल तर त्याच्यावर कारवाई होणे देखील आवश्यक आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी अशा प्रकारची कारवाई तात्काळ करावी अन्यथा आम्हाला याचा जाब राज्याच्या मुख्य सचिवांना विचारावा लागेल, असा इशारा देशमुख यांनी दिला आहे. त्याचप्रमाणे जनतेने त्या त्या भागातील बेकायदेशीर खडी क्रशर आणि खदानी तात्काळ बंद करण्यासाठी आंदोलन उभे केले पाहिजे. जोपर्यंत त्या त्या भागातील जनता उभी राहत नाही, तोपर्यंत अशा अपप्रवृत्ती थांबणार नाहीत. त्यामुळे जनतेनेही आपापल्या भागातील बेकायदा खडी क्रशर आणि खदानीबाबत आंदोलन उभारावे. आपण त्यांना प्रशासकीय पातळीवर मदत करू, असे अँड. देशमुख यांनी म्हटले आहे.

# कलश इन्टरटमेंट तर्फे अस्तित्व नारी सन्मान पुरस्कार २०२४ चे धुमधडाक्यात वितरण.

**दैनिक वादळ वार्ता**
**उरण/विठ्ठल ममताबादे**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून श्लोक पाटील व कल्पना सुर्वे यांच्या संकल्पनेतून त्यांनी साकारलेल्या कलश इन्टरमेंट तर्फे अस्तित्व नारी सन्मान पुरस्कारांचे वितरण मोठ्या धुमधडाक्यात आणि जल्लोषात साजरे झाले.

उरणमधील सिल्वर ओक ट्रॉपिकल रिसॉर्ट या ठिकाणी हा पुरस्कार वितरणाचा सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी या भव्य दिव्य कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या मराठी अभिनेत्री व कलाकार भार्गवी चिरमुले, शैलजा घरत, राष्ट्रवादी महिला काँग्रेस प्रदेशाध्यक्षा भावना घाणेकर व माजी नगराध्यक्षा सायली म्हात्रे यांच्या सह इतर मान्यवर महिला उपस्थित होत्या. आलेल्या मान्यवरांवर पुष्पवृष्टी ने स्वागत करून या सुंदर कार्यक्रमाची सुरुवात झाली.

खर तर अस म्हणतात एक महिला दुसऱ्या महिलेचा द्वेष, तिरस्कार करते पण अस नाही तर इथे श्लोक पाटील व कल्पना सुर्वे या दोन महिलांनी प्रत्येक क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतलेल्या महिलेस तीच्या कामाची पोचपावती, तीला प्रोत्साहन व इतर महिलांना त्यांच्या या नेत्रदीपक यशातून प्रेरणा मिळावी, तसेच प्रत्येक महिलेला तीने केलेल्या तीच्या कार्यांचा गौरव व्हावा या उद्देशाने तसेच तीच्या तील असलेल्या सुप्त गुणांना एक व्यासपीठ मिळावे या उदात्त हेतूने या पुरस्काराचे आयोजन करण्यात आले होते.

प्रमुख पाहुण्यांच्या मनोगतात अभिनेत्री भार्गवी चिरमुले यांनी आपल्या भाषणात सांगितले की, मला आज पहिल्यांदा समजले की “उरण मध्ये इतक्या उद्योजिका आहेत,




विविध क्षेत्रात विशेष कामगिरी करत आहेत, त्याकरिता कोणतेही वय असावे लागत नाही तर कौतुकाची थाप आणि आपल्याला पाठीवर लढ म्हणणारे असणे हे अत्यंत गरजेचे असते. “ तसेच आलेल्या प्रत्येक मान्यवरांनी सन्मानित महिलांना व जमलेल्या महिलांना त्यांच्या कार्याचा गौरव करून त्यांना पुढील यशस्वी कामगिरीसाठी शुभेच्छा दिल्या.

सन्मान चिन्ह हे मंगल कलशाची प्रतिकृती ठेवण्यात आली होती. या सन्मान चिन्हाच्या पार्टनर शैलजा घरत या होत्या. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या एकूण २३ महिलांना या मंगल कलशाचे सन्मान चिन्ह,प्रशस्तीपत्र व एक सुंदर रोपट देऊन गौरवण्यात आले. गौरवण्यात आलेल्या महिलांनीही सोहळ्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली व सर्वांचे आभार मानले.

कलश इन्टरटमेंट च्या सर्वेसर्वा श्लोक पाटील आणि कल्पना सुर्वे यांनी याविषयी माहिती देत असताना त्या म्हणाल्या “ हा आमचा हा फस्ट सिझन आहे यापुढे आम्ही जास्त कॅटेगरीज घेऊ जास्तीत जास्त क्षेत्रातील महिलांना एक ओळख निर्माण करून देऊ तर फक्त उरणच नाही तर उरण च्या बाहेरच्या महिलांसाठी ही संधी आम्ही देऊ जेणेकरून उरण चे नाव उरण च्या बाहेरही जाऊ दे.” असे मनोगत व्यक्त केले.

यावेळी सर्व पत्रकार प्रतिनिधींनाही सन्मान चिन्ह देऊन गौरवण्यातआले. कार्यक्रमाच्या वेळी विविध डान्स ग्रुपने आपले सादरीकरण करून वाहवा मिळवली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिपक शेट्टी यांनी सुंदर भाषाशैलीत केले. तर श्लोक पाटील यांनी सर्वांचे आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्लोक पाटील आणि त्यांची कार्यकारी टिमने विशेष मेहनत घेतली.

# जिल्हयाबाहेर चारा वाहतुक करण्यास बंदी आदेश कायम- जिल्हादंडाधिकारी

**वादळवार्ता/बीड**

जिल्हयात सरासरीपेक्षा कमी पर्जन्यमान झाल्याने पशुधनासाठी चा-याची टंचाई होण्याची गंभीर शक्यता असल्याने जिल्हयाबाहेर चारा वाहतूक करण्यास मनाई आदेश ३१ ऑगस्टला काढण्यात आला असून तो अद्याप कायम असल्याचे जिल्हादंडाधिकारी दिपा मूधोळ- मुंडे यांनी आज झालेल्या बैठकीत सांगीतले. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत पुनर्विचार करण्यात आला.

जिल्हयात सरासरी पेक्षा कमी पर्जन्यमान झाले असून भविष्यात पशुधनासाठी चा-याची टंचाईची परिस्थिती गंभीर होण्याची शक्यता आहे. चा-याची उपलब्धता पाहता भविष्यात टंचाई भासु शकते.

जिल्हयात उपलब्ध होणारा सर्व प्रकारचा चारा याची इतर जिल्हयात वाहतुक करण्यास बंदी आणने जिल्हयाबाहेरील निविदा धारकांना लिलाव देण्यात येऊ नये. करुन बीड जिल्हयात चारा टंचाई भासणार नाही.तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही यासाठी जिल्हादंडधिकारी दिपा मूधोळ-मुंडे यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ नुसार बीड जिल्हयात उत्पादित होणारा किंवा सद्यस्थितीत असणारा सर्व प्रकारचा वाळलेला व ओला चारा बीड जिल्हयाबाहेर वाहतुक करण्यास चारा व्हातुक बंदी आदेश 31/8/2023 पासून लागू असून पुढील आदेश येईपर्यंत मनाई करण्यात आली आहे.

# गेवराई पत्रकार संघाला राज्यस्तरीय पुरस्कार अध्यक्ष अंकुश आतकरेंचा पुरस्काराने सन्मान

**वादळवार्ता/गेवराई**

मागिल आठ वर्षापासून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबई या संघटनेचे तर गेवराई पत्रकार संघाचे सलग १३ वर्षांपासून अध्यक्ष असलेले गेवराई पत्रकार संघाचे अध्यक्ष अंकुश आतकरे यांना पुणे येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय पत्रकार संघाच्या अधिवेशनात विविध मान्यवरांच्या उपस्थितीत राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकार संघाचे अध्यक्ष म्हणून गौरविण्यात आले आहे.

सदरील राज्यस्तरीय पुरस्कार खा.अमोल कोल्हे,आ.बच्चू कडू,पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे,महासंघाचे सचिव विश्वासराव आरोटे,मराठवाडा विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी, निरंजन टकले, महेश म्हात्रे, संजय आवटे, मंदार खणसे,



सम्राट फडवीस आशिष जाधव आदि मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल व श्रीफळ देऊन गेवराई येथील पत्रकार संघाचे अध्यक्ष अंकुश आतकरे यांना उत्कृष्ट पत्रकार संघाचे अध्यक्ष म्हणून पुरस्कार देण्यात आला आहे.आतकरे यांना हा पुरस्कार मिळताच संपूर्ण राज्यातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. तर संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, विभाग अध्यक्ष वैभव स्वामी दैनिक सूर्योदय संपादक गंगाधर नाना काळकुटे, कार्यकारी संपादक दीपक काळकुटे प्रवीण वडमारे, हनुमान मात्रे, पत्रकार संघाचे विभागीय उपाध्यक्ष सुनील पोपळे जिल्हा उपाध्यक्ष सुनील मुंडे, शहराध्यक्ष कैलास हादगुले उपाध्यक्ष भागवत देशपांडे, राजेंद्र नाटकर, सचिव तुळशीराम वाघमारे, कार्याध्यक्ष अनिल आगुंडे, कोषाध्यक्ष सुदर्शन देशपांडे सह मित्र परिवारांनी सत्कार केला.

दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव दैनिक
वादळ वार्ता



परभणी येथील कामगार कार्यालयातील जिल्हा कामगार अधिकारी श्री व्ही एन माणगावकर यांच्यावर दिनांक १९ मार्च रोजी अज्ञात व्यक्तीने तोंडावर ऑइल फेकल्याच्या निषेधार्थ बीड येथील कामगार कार्यालयासमोर कामगार कर्मचाऱ्यांच्या वतीने आज दिनांक २० मार्च रोजी जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला

# पाटोद्याच्या महासागवी तलावातील पाणी साठ्याची जिल्हाधिकारी यांनी केली पाहणी

## पाणीसाठा सुरक्षित ठेवण्याच्या केल्या सूचना

**वादळवार्ता/पाटोदा**

पाटोदा शहराला पिण्याचे पाण्याची टंचाई भासू नये म्हणून महासागरी प्रकल्पातील पाणीसाठा सुरक्षित ठेवण्याची सूचना जिल्हाधिकारी दीपा मुघोळ मुंडे यांनी तहसीलदार यांना केल्या जिल्हाधिकारी दीपा मुघोळ मुंडे यांनी मंगळवारी अचानक पाटोदा तालुक्यातील महासांगवी मध्यम प्रकल्पाला भेट दिली व पाणीसाठ्याची पाहणी केली पाटोदा शहराला पाणीपुरवठा हा महा सांगवी प्रकल्पातून होत असतो यावर्षी पाटोदा तालुक्यात अल्प असे पर्जन्यमान झाल्यामुळे भविष्यात पाणीटंचाई निर्माण होऊ शकते या कारणाने यापूर्वीच जिल्हाधिकारी महोदयांनी पाटोदा तालुक्यातील सर्वच मध्यम प्रकल्पातील पाणीसाठा हा ४०% सुरक्षित ठेवण्याच्या सूचना केल्या होत्या मात्र प्रशासकीय दुर्लक्षामुळे अनेक तलावात शेतकऱ्याच्या अवैधरित्या मोटारी चालू होत्या त्यामुळे अनेक तलावातील पाणीसाठा हा ४०% पेक्षा कमी हा राहिलेला आहे

मार्च महिन्यातच अनेक गावांना पाणीटंचाईचा सामना करण्याची वेळ आली आहे. उन्हाळ्यात पाणीटंचाई भासू नये यासाठी जिल्हाधिकारी श्रीमती दीपा मुधोळ-मुंडे यांनी मंगळवारी दिनांक १९ रोजी महासांगवी तलावातील पाणी साठ्याची पाहणी केली व तत्काळ पाणी आरक्षित करण्याचे सूचना संबंधित विभागाकडे केल्या विशेष म्हणजे तहसीलदार यांनी जानेवारीमध्ये ४०% पेक्षा कमी पाणीसाठा असलेल्या तालावातील अवैध पाणी उपसा रोखण्यासाठी तलाव आरक्षित ठेवले त्या वेळेस महासांगवी तलावात ४०% पक्षा जास्त पाणासाठा शिल्लक हाता मात्र

मार्च महिना सुरू होताच या तलावातील पाणीसाठा ४०% पेक्षा कमी झालं आहे उन्हाळ्यात शहरातील नागरिकांना पाणीटंचाई भासू नये यासाठी जिल्हाधिकारी यांनी महासांगवी तलावातील पाणी उपसा तात्काळ बंद करण्याच्या सुचना संबंधित विभागाला देताच तलाव परिसरातील विद्युत पुरवठा खंडित करण्यात आला. शेतकऱ्यांनी अवैध रित्या पाणी उपसा केल्यास कायदेशीर कारवाई करून विद्युत मोटारी जप्त करण्यात येतील अशा



सूचना दिल्या यावेळी उपविभागीय अधिकारी प्रमोद कुदळे, तहसीलदार डि. बी. निलावड डीवायएसपी धाराशिवकर, शाखा अभियंता विजय पाखरे, नायब तहसीलदार सुनील ढाकणे, पोलीस निरीक्षक अनमोल केदार, महावितरण कंपनीचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते

# सोलापूर लोकसभेसाठी कव्हे ग्रामपंचायत मधुन दोन उमेदवार सर्व खर्च लोकवर्गणीतून करणार सकल मराठा समाजाच्या बैठकीत निर्णय

**दैनिक वादळ वार्ता**
**सोलापूर/विश्वास चोपडे**

कव्हे ता. माढा येथे दिनांक २०/०३/२०२४ रोजी सकल मराठा समाजाची बैठक बैठक पार पडली यामध्ये मनोज जरांगे पाटील यांनी २४ मार्चला निर्णायक बैठक घेतली आहे व आंदोलनाची पुढील दिशा ठरवणार आहेत.या बैठकीला सकल मराठा बांधव जास्तीत जास्त प्रमाणात जाण्यासाठी कव्हे ग्रामपंचायत येथे



सकल मराठा बांधवांनी बैठकीच्या आयोजन केले होते.यामध्ये जरंगे पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे लोकसभेसाठी कव्हे येथील सकल मराठा बांधवांनी दोन उमेदवार निवडलेले आहेत. यामध्ये धनंजय शहाजी ताकमोगे व सागर बाळासाहेब चोपडे हे आहेत यांचा खर्च हा कव्हे सकल मराठा बांधव लोकवर्गणीतून करणार आहेत. परंतु २४ मार्चला जरंगे पाटील जो निर्णय घेतील. हा सर्वांना मान्य आहे. व त्यावेळेस पुढील दिशा ठरवण्यात येईल असे या बैठकीदरम्यान ठरवण्यात आले.

# कॉँग्रेस महाराष्ट्रात तब्बल १८ जागांवर लढणार, सूत्रांची माहिती

महाराष्ट्राच्या राजकारणातील मोठी बातमी समोर आली आहे. महाविकास आघाडीच्या जागावाटपाचा फॉर्म्युला अजून जाहीर झालेला नाही. भाजपकडून एकीकडे 20 उमेदवारांची नावे जाहीर झाली असली तर महाविकास आघाडीकडून अद्याप लोकसभा निवडणुकीसाठी जागावाटपाचा फॉर्म्युला ठरलेला नाही. महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांची उद्या मुंबई महत्त्वाची बैठक होणार आहे. या बैठकीत जागावाटपाबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल आणि मग जागावाटप जाहीर होण्याची शक्यता आहे. असं असताना आता देशाची राजधानी असलेल्या दिल्लीतून एक मोठी बातमी समोर आली आहे. दिल्लीत काँग्रेसची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली आहे. या बैठकीत महाराष्ट्रात काँग्रेस 18 जागांवर निवडणूक लढणार असल्याच्या निर्णयावर शिक्कामोर्तब झालं आहे.

दिल्लीत आज काँग्रेसच्या केंद्रीय निवडणूक समितीची बैठक पार पडली. या बैठकीसाठी महाराष्ट्रातील काँग्रेसचे प्रमुख नेते दिल्लीला गेले आहेत. यामध्ये प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात, काँग्रेस आमदार सतेज पाटील यांचा समावेश आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि माजी राष्ट्रीय अध्यक्षा सोनिया गांधी यांच्या उपस्थितीत ही बैठक पार पडली. या बैठकीत महाराष्ट्रात 48 पैकी 18 जागांवर निवडणूक लढवण्याच्या निर्णयावर शिक्कामोर्तब झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे आता महाविकास आघाडीत जागावाटपात पुन्हा पेच निर्माण होतो का? ते पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

# नगद नारायण महाराजांची भक्तांवर नगद कृपा होते

## संत नगदनारायण महाराजांच्या पुण्यतिथी सोहळ्यात जगन्नाथ महाराजांचे प्रतिपादन

**वादळवार्ता/गेवराई**



महाराष्ट्राच्या आध्यात्मिक वाटचालीत गडाची भूमिका महत्त्वाची आहे. तर महाराष्ट्राची धाकटी पंढरी म्हणून नारायणगडाची ओळख आहे. तसेच जो भक्त संत महात्मा नगद नारायण महाराजांची मनोभावे भक्तिभावाने भक्ती करतो त्या भक्तांवर नगदनारायण महाराजांची नगद कृपा होते असे प्रतिपादन हभप जगन्नाथ पाटील (मुंबई) यांनी व्यक्त केले.

स्वानंद सुखनिवासी संत कुलभूषण महात्मा वै.ह.भ.प. नगदनारायण महाराज यांच्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त गेवराई शहरातील गजानन महाराज मंदिरात भव्यदिव्य स्वरुपात सुरु असलेल्या १३ व्या भव्य किर्तन सोहळयात तिसरे पुष्प गुंफताना जगन्नाथ महाराज बोलत होते. यावेळी पंचक्रोशीतील संत- महंत, टाळकरी, वारकरी तसेच महिला व पुरुष भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती

पुढे बोलताना जगन्नाथ महाराज पाटील म्हणाले की, गडपरंपरेची गंगोत्री म्हणजे नगद नारायण महाराज यांनी श्री क्षेत्र नारायण गड संस्थान निर्माण केले आणि त्यावर भजनाचा मळा फुलवला त्याचा परिणाम समाधानाची फळ आज आपण चाखतो आहोत. तसेच जीवनात माऊलीचं नाव घ्या आणि ज्ञानेश्वरीचे वाचन करा तुमच्या मनात प्रश्नाने गोंधळ घातलाय त्या प्रश्नाचे उत्तर तुम्हाला त्यात मिळेल असा माऊलीचा आशीर्वाद आहे. नगदनारायण महाराजांच्या पुण्यतिथी सोहळ्यात प्रत्येकाने सहभागी होऊन इथे यावं ज्यांची पुण्यतिथी आहे.त्यांचं नाव घ्यावं आणि झालेलं पुण्य घेऊन घरी जावं असा सल्लाही शेवटी बोलताना त्यांनी दिला.

# आई वडिलांची सेवा हीच सर्वात मोठी ईश्वर सेवा आहे-भागवताचार्य अंभोरे

**दैनिक वादळ वार्ता**
**नायगाव/हानुमंत चंदनक**

आपल्याला जन्म दिलेल्या आई-वडिलांची नित्य नियमाने दररोज सेवा केली तर कोणत्याही दुसऱ्या देवाची पूजा करण्याची गरज नसून आई-वडिलांची सेवा हीच सर्वात मोठी ईश्वरसेवा आहे यासाठी प्रत्येकाने आपल्या आई-वडिलांची सेवा करावी असे मत भागवताचार्य दशरथ महाराज अंभोरे पंढरपूरकर यांनी केले.

शंकरनगर येथे माजी मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे भाग्यविधाते भास्कररावजी पाटील खतगावकर यांच्या संकल्पनेतून बांधण्यात आलेल्या श्री साईबाबा मंदिरातील साईबाबा मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठा सोहळा प्रसंगी प.पू.भागवतचार्य दशरथ महाराज आंभोरे(पंढरपूर) यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी सद्गुरू सिध्ददयाळ शिवाचार्य महाराज बेटमुगरेकर, १०८ सद्गुरू यदुबंन महाराज कोलंबीकर, सद्गुरू नराशम महाराज येवतीकर, सद्गुरू शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुकर व संत महंतांच्या उपस्थित श्री साईबाबा मुर्ती प्राणप्रतिष्ठापना सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. माजी खा. भास्करराव पाटील खतगावकर सपत्नीक श्री साईबाबा यांच्या मूर्तीचे विधिवत पूजा करून श्रींची महाआरती करण्यात आले. त्यानंतर उपस्थित भाविक भक्तांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

यावेळी प.पू. श्री यदुबन गुरु गंभीरबन महाराज, गुरुवर्य शिवानंद शिवाचार्य महाराज तमलूरकर, गुरुवर्य सिद्धदयाळ शिवाचार्य महाराज बेटमोगरेकर,परमपूज्य श्री नराशाम महाराज येवतीकर,आमदार राम पाटील रातोळीकर,आमदार जितेश अंतापुरकर,आमदार तुषार राठोड,माजी आमदार वसंतराव पाटील चव्हाण,माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा,माजी आमदार सुभाष साबणे, माजी आमदार हनमंतराव पाटील बेटमोगरेकर,माजी शिक्षण सभापती मिसाळे गुरुजी, माजी शिक्षण सभापती शिवराज पाटील होटाळकर,उद्योजक मारोतराव पाटील कवळे गुरुजी,माजी उपमहापौर सरजीतसिंग



गिल,नायगावचे उपनगराध्यक्ष विजय पाटील चव्हाण, बाळासाहेब पाटील खतगावकर,सभापती रवी पाटील खतगावकर,प्रा.बंडू पाटील चव्हाण,शिवाजी पाटील पाचपिळीकर, दीपक पावडे,राजीव गंदीगुडे,भास्कर पाटील भिलवंडे,आनंदराव बिराजदार गुरुजी, संभाजी पाटील भिलवंडे, बाबाराव पाटील भाले, शिवाजीराव कणकंटे,डॉ. आनंद पाटील खतगावकर,अनिल पाटील खानापूरकर,खुशाल पाटील उमरदरीकर,प्रमोद पाटील खतगावकर,ॲड.बाळकृष्ण शिंदे,एकनाथ पाटील वडगावकर, नंदू सावकार दासेटवार,दत्ता पाटील, शिवाजीराव देशमुख बळेगावकर, प्रीतम देशमुख हाणेगावकर, शिवराज पाटील माळेगावकर, रमेश पाटील शेटकर,अतुल पाटील खतगावकर,नागेंद्र पाटील सांगवीकर, पत्रकार बाळासाहेब पांडे,पत्रकार गजानन चौधरी,बालाजी पाटील वनाळीकर,संतोष पाटील पुयड,रुपेश पाटील भोकसखेडकर,यांच्यासह नायगाव,बिलोली,देगलूर,उमरी धर्माबाद, मुखेड तालुक्यातील बहुसंख्य साईभक्त व परिसरातील बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

सदरील कार्यक्रमाचे आयोजन माजी मंत्री भास्कररावजी पाटील खतगावकर व माजी जिल्हा परिषद सदस्या डॉ.मीनलताई पाटील खतगावकर यांनी केले होते.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मुद्रक ग्राफिक्स डी. टी. पी.डिझाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथून डिजिटल छापून संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथून त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )